ePaper


## गडचिरोलीत गोदावरी नदीपात्रात 8 तरुण बुडाले, शोध मोहिम सुरु!

| वर्ष - 8 | अंक - 301 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

### आतील पानांत

- कोहलीविरूद्ध गुन्हा दाखल केला?
- रोहित भाई गार्डनमध्ये फिरतोय
- पाचवी अर्थव्यवस्था असल्याने आमंत्रण
- आपत्ती-प्रतिरोधक पायाभूत सुविधांवर भर

www.mahaenews.com | रविवार , दि. 8 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा महाराष्ट्रातील निवडणुकीवर तीव्र आक्षेप : म्हणाले, ‘फिक्सिंग’ मुळेच महायुती विजयी

# भाजपा ‘फिक्सिंग मास्टर’!

## निवडणूक आयोगावरही तीव्र टीकास्त्र : आयोग तर भाजपाच्या हातचे बाहुले !

| नवी दिल्ली / मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी ‘पेपर बॉम्ब’ टाकून एकाच दगडात भारतीय जनता पार्टी, निवडणूक आयोग आणि मतदार अशा सर्वांनाच घायाळ करण्याचा प्रयत्न केला आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबत राहुल गांधी यांनी भाजपावर थेट आरोप केले आहेत. महाराष्ट्रातील निवडणूक हे ‘मॅच फिक्सिंग’ होते आणि असेच फिक्सिंग करून बिहारमधील निवडणुकाही भाजपा जिंकणार, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. निवडणूक आयोग हे भाजपाच्या हातचे बाहुले असून त्यांच्याकडून लोकशाहीवर होत असलेला हा विषप्रयोग आहे, असेही राहुल गांधी म्हणाले.**



### एका इंग्लिश वृत्तपत्रात लिखाण..

राहुल गांधी यांनी एका इंग्लिश वृत्तपत्रात लेख लिहिला असून आपल्या लेखात म्हटले आहे की, या निवडणुकीत ‘मॅच फिक्सिंग’ करण्यात आले होते, ज्यामध्ये भाजपचा विजय आगाऊ सुनिश्चित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले होते. त्यांनी नमूद केले आहे, की भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांनी निवडणुका जिंकण्यासाठी पाच टप्प्यांची योजना आखली होती. महाराष्ट्राप्रमाणेच पुढील वेळी बिहारमध्येही ‘मॅच फिक्सिंग’ होईल, मग ज्या राज्यात भाजप पराभूत होत असल्याचे दिसते तेथे असे फिक्सिंग होत असते, असाही आरोप त्यांनी केला.

### आयोगाने आरोप फेटाळले..

निवडणूक आयोगाने राहुल गांधींचे दावे निराधार असल्याचे म्हटले आहे. आयोगाने म्हटले आहे की, निवडणुकीचे निकाल तुमच्या बाजूने नसल्यानंतर असे आरोप करणे हास्यास्पद आहे. दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी काँग्रेसला पाठवलेल्या उत्तरात ही सर्व तथ्ये मांडण्यात आली आहेत, जी निवडणूक आयोगाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत. असे दिसते की असे मुद्दे पुन्हा पुन्हा उपस्थित करून या सर्व तथ्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे.

### मतदारांचा विश्वास नाही

राहुल गांधींनी पुढे लिहिले आहे, की महाराष्ट्रात भाजपा इतकी घाबरली होती, हे समजणे कठीण नाही, पण हेराफेरी ही मॅच फिक्सिंगसारखी आहे. फसवणूक करणारी टीम जिंकू शकते, पण ती संस्था कमकुवत करते. लोकांचा निवडणुकांवरील विश्वास उडतो. प्रत्येक जबाबदार भारतीयाने हे पुरावे पाहिले पाहिजेत आणि प्रश्न विचारले पाहिजेत. निवडणुकीत ‘मॅच फिक्सिंग’ हे कोणत्याही लोकशाहीसाठी विष आहे.मी कोणत्याही छोट्या निवडणूक अनियमिततेबद्दल बोलत नाही, तर मी अशा हेराफेरीबद्दल बोलत आहे, जी मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती.

### नियुक्त्यांमध्येच हेराफेरी..

निवडणूक आयुक्त नियुक्ती कायद्याद्वारे, सीजेआयच्या जागी निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करणाऱ्या समितीमध्ये एका केंद्रीय मंत्र्यांची नियुक्ती करण्यात आली. यामुळे निष्पक्षता संपली आणि संपूर्ण नियंत्रण सरकारच्या हातात गेले. मुख्य न्यायाधीशांना काढून कॅबिनेट मंत्री नियुक्त करणे योग्य वाटत नाही. विचार करा, एखाद्या निष्पक्ष व्यक्तीला काढून स्वतःचा माणूस का नियुक्त करायचा असेल? याचे उत्तर आपोआप सापडते, असेही त्यांनी म्हटले आहे.

### देवेंद्र फडणवीस यांचे उत्तर..

या संदर्भात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की राहुल गांधी स्वतःला खोटे आश्वासन देत आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी २०२४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबाबत राहुल गांधी यांचे आरोप फेटाळून लावले. ते म्हणाले, ‘राहुल गांधींनी बिहारमध्ये आपला पराभव स्वीकारला आहे. जोपर्यंत ते जमिनीवर उतरत नाहीत आणि वस्तुस्थिती समजून घेत नाहीत, तोपर्यंत त्यांचा पक्ष जिंकू शकत नाही. त्यांनी आपल्या शब्दांनी महाराष्ट्रातील मतदारांचा अपमान केला आहे.

### निवडणूक आयोगाचे तीन मुद्दे..

जेव्हा कोणी अशी चुकीची माहिती पसरवते, तेव्हा तो राजकीय पक्ष निवडणुकीदरम्यान नियुक्त केलेल्या हजारो प्रतिनिधींची बदनामी करतो. तसेच दिवसरात्र अथकपणे निवडणुकीच्या कामात कर्तव्य बजावणाऱ्या लाखो निवडणूक कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खचवतो. संपूर्ण देशाला माहिती आहे,की प्रत्येक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया, ज्यामध्ये मतदार यादी तयार करणे, मतदान करणे आणि मतमोजणी करणे समाविष्ट आहे, ती सरकारी कर्मचाऱ्यांकडून केली जाते. तीही मतदान केंद्रापासून मतदारसंघापर्यंत राजकीय पक्षांनी/उमेदवारांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत केली जाते. मग, निवडणुकीचे निकाल त्यांच्या बाजूने न आल्यानंतर, हे पूर्णपणे हास्यास्पद असल्याचे सांगून निवडणूक आयोगाची बदनामी करण्याचा प्रयत्न केला जातो, आणि हे वारंवार होत आहे.

### एकनाथ शिंदे यांची टीका..

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, काँग्रेसचा खोटी कहाणी पसरवण्याचा प्रयत्न सुरू आहे. लोकसभा निवडणुकीत जेव्हा महाविकास आघाडीने महाराष्ट्रात चांगली कामगिरी केली, तेव्हा राहुल गांधी काहीही बोलले नाहीत. . आता, ते खोटे विधान पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत.

# वारीत नव्या लालपरीतून प्रवास!

## पांडुरंगाच्या दर्शनासाठी नऊ वर्षानंतर एसटीच्या नव्या बसेस

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**यंदाची आषाढी वारी वारकऱ्यांसाठी सुखद ठरणार आहे. राज्य परिवहन महामंडळाने नवीन बसेस घेतल्या आहेत. या बसेसमधून आषाढी वारीचा प्रवास भाविकांना करता येणार आहे. तब्बल नऊ वर्षानंतर नवीन बसेसची खरेदी महामंडळाने केली आहे.**



नऊ वर्षानंतर एसटीच्या ताफ्यात नव्या बसेस, आषाढी वारीत पांडुरंगाच्या दर्शनासाठी नव्या लालपरीतून सुखद प्रवासगाव तेथे एसटी असे घोषवाक्य असलेली लालपरी गावागावात धावत असते. राज्यभरातील प्रवाशांसाठी लालपरी प्रवासाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. गेली अनेक वर्ष एसटीच्या ताफ्यात नवीन बसेसचा समावेश केला गेला नव्हता. परंतु आता राज्य परिवहन महामंडळाने तीन हजार नवीन बसेसची खरेदी केली आहे. आषाढी वारीत भाविकांना या नवीन बसेसमधून प्रवास करता येणार आहे. राज्यभरातून वारीसाठी दोन हजार बस धावणार आहेत. यामुळे वारकऱ्यांचा एसटी प्रवास सुखद होणार आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात नऊ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नवीन लालपरी दाखल होत आहे. त्यामुळे यंदाच्या आषाढी वारीत पुण्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाडक्या पांडुरंगाच्या भेटीला जाणाऱ्या भाविकांना नवीन लालपरीचा सुखद प्रवास अनुभवता येणार आहे.

### २०१६ नंतर बसेसची खरेदी

काही वर्षांपूर्वी आषाढी वारी आणि दिवाळीपूर्वी एसटीच्या ताफ्यात नवीन बस दाखल होत होत्या. मात्र, २०१६ नंतर एसटी महामंडळाकडून नवीन बसची खरेदी झालीच नाही. त्यामुळे मागील नऊ वर्षांपासून जुन्या बसनेच आषाढी वारी, दिवाळी यांचा प्रवास सुरू होता. गेल्या काही वर्षांत आषाढी वारीत वारकऱ्यांना आणि दिवाळीला गावी जाणाऱ्या प्रवाशांना नवीन लालपरीचा प्रवासाचा सुखद अनुभव येत नव्हता. मागील वर्षी पुणे विभागातून आषाढी वारीसाठी पुण्यातून पंढरपूरसाठी ३८० बस सोडण्यात आल्या. या सर्व बस जुन्या होत्या. परंतु आता नवीन बसेसची खरेदी झाली आहे. त्यामुळे भाविकांचा प्रवास सुखद होणार आहे. यंदा राज्यातील सर्व आगारांत एसटीच्या ताफ्यात नव्या लालपरी दाखल होत आहेत. पुणे विभागात ६५ लालपरी नव्याने दाखल झाल्या आहेत. पुढील महिन्याभरात तेवढ्याच बस दाखल होणार आहेत. महामंडळाच्या ताफ्यात आतापर्यंत दीड हजार बस दाखल झाल्या आहेत.

### नवीन बसेसमध्ये अनेक सुविधा

तसेच पुढील एक महिन्यात आणखी एक हजार बसेस येणार आहे. एसटी महामंडळाने तीन हजार नवीन बसेस घेतल्या आहे. या बसेस अत्याधुनिक आहेत. यामध्ये अनेक सुविधांचा समावेश केला आहे. तीन बाय दोन या पद्धतीने या बसेसची बांधणी करण्यात आली आहे. या बसमध्ये डिजिटल डॅशबोर्ड, सेन्सरयुक्त इंजिन, कॅमेरे, चार्जिंग पोर्ट्स दिले आहे. तसेच बसमध्ये काही बिघाड झाला तर ते शोधण्यासाठी संगणक प्रणाली आहे. या बसेस चेसिसवर न बांधता आधुनिक तंत्रज्ञानाने तयार केल्या आहेत.ताफ्यात नव्या बसेस, आषाढी वारीत पांडुरंगाच्या दर्शनासाठी नव्या लालपरीतून सुखद प्रवासगाव तेथे एसटी असे घोषवाक्य असलेली लालपरी गावागावात धावत असते.

---

# भाजीपाल्याचे दर कडाडले!

## अनेक भाज्या शंभरी पार, पावसाचा फटका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मान्सूनच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा पुणे जिल्ह्यासह विभागात पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे भाज्यांचे नुकसान झाले असून, तोडणीही थांबली आहे. याचा परिणाम म्हणजे मार्केट यार्डातील घाऊक बाजारात फळभाज्यांची आवक घटली आहे. दुसरीकडे ग्राहकांकडून भाज्यांना मागणी वाढली असल्याने बहुतांश प्रकारच्या भाज्यांच्या भावाने शंभरी ओलांडली आहे. भाज्यांच्या भावात २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे.**



मार्केट यार्डातील भाजीपाला विभागात इतर वेळी राज्य आणि परराज्यातून दररोज 90 ते 100 ट्रक भाज्यांची आवक होते. मात्र, सध्या ही आवक 10 ते 20 ट्रकने कमी झाली आहे. भाज्यांची आवक कमी आहेच, शिवाय भिजलेल्या आणि कमी प्रतिच्या मालाचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे दर चांगेलेच वाढले आहेत.

भाजीपाला उत्पादनाला पावसाचा चांगलाच फटका बसला आहे, पुणे जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी अतिमुसळधार पाऊस झाला होता, या पावसामुळे फळं आणि भाजीपाल्याचं मोठं नुकसान झालं. त्यानंतर पावसानं उघडीप दिली, पुन्हा एकदा आवक सुरू झाली, मात्र आता पावसानं हजेरी लावल्यामुळे भाज्यांचे नुकसान झाले असून, तोडणीही थांबली आहे. याचा परिणाम म्हणजे मार्केट यार्डातील घाऊक बाजारात फळभाज्यांची आवक घटली आहे. भाजीपाल्याची आवक घटली आहे, मात्र दुसरीकडे मागणी जास्त असल्यामुळे भाजीपाल्यांचे दर गगनाला भिडले आहेत. बाजारात मेथीच्या जुडीची ६० ते ७० रुपयांना विक्री करण्यात आली आहे आतापर्यंतचा हा उच्चांकी दर आहे. आधीच महागाईनं सर्वसामान्यांचं कंबरडं मोडलं आहे, वाढत्या महागाईचा सामना करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे,

### शेतकऱ्यांचे म्हणणे

"जमीन कोरडी पडलीय, पाणी नाही, रोपे मरतायत. उत्पादन कमी झालंय, त्यामुळे दर वाढले," असे स्थानिक शेतकरी सांगतात. काही ठिकाणी वाढीव खर्चामुळे शेतकरी माल विक्रीस आणण्यास टाळाटाळ करत आहेत. पुणे व परिसरात मॉन्सूनला विलंब झाल्यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. पावसाअभावी भाजीपाल्याचे उत्पादन घटले.

त्यातच आता भाजीपाल्यांचे दर देखील वाढले आहेत. भाज्यांच्या दरांमध्ये तब्बल वीस ते तीस टक्क्यांनी वाढ झाली आहे, याचा फटका गृहिणींना बसण्याची शक्यता आहे. यार्डातील भाजीपाला विभागात इतर वेळी राज्य आणि परराज्यातून दररोज 90 ते 100 ट्रक भाज्यांची आवक होते. मात्र, सध्या ही आवक 10 ते 20 ट्रकने कमी झाली आहे. भाज्यांची आवक कमी आहेच, शिवाय भिजलेल्या आणि कमी प्रतिच्या मालाचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे दर चांगेलेच वाढले आहेत.

भाजीपाला उत्पादनाला पावसाचा चांगलाच फटका बसला आहे, पुणे जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी अतिमुसळधार पाऊस झाला होता, या पावसामुळे फळं आणि भाजीपाल्याचं मोठं नुकसान झालं. त्यानंतर पावसानं उघडीप दिली, पुन्हा एकदा आवक सुरू झाली, मात्र आता पावसानं हजेरी लावल्यामुळे भाज्यांचे नुकसान झाले असून, तोडणीही थांबली आहे.

## पिंपरी चिंचवडमध्ये तीस मिनिटाच्या पावसाने

# हिंजवडी परिसर झाला 'वॉटर पार्क'!

## अर्धा तास पडलेल्या पावसामुळे शहराची दैना!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा एकदा शनिवारी पिंपरी चिंचवडमध्ये जोरदार हजेरी लावली. शहरात आज सकाळी आलेल्या दमदार पावसामुळे आयटी पार्क हिंजवडी हा परिसर अक्षरशः 'वॉटर पार्क' झाला. अवघा अर्धा तास आलेल्या दमदार पावसामुळे हिंजवडी परिसरातील रस्ते पाण्याने तुंबले. तर काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने दुचाकी वाहन देखील वाहून गेले आहेत. हिंजवडीप्रमाणे शहरातील भोसरी, कासारवाडी, रावेत, पिंपळे निलख यांसारख्या भागामध्ये ही पाणी साठलेले पाहायला मिळाले.**



पिंपरी चिंचवड: पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाच्या नालेसफाई, आपत्कालीन व्यवस्थापन, बैठका, प्रशासकीय आदेश या सर्व गोष्टी फोल ठरल्याचे या निमित्ताने पाहायला मिळाले.

पावसाळ्यापूर्वी हिंजवडी प्रमाणेच शहरातील विविध परिसरामध्ये ड्रेनेज लाईन आणि नालेसफाई योग्य पद्धतीने न ~~झाल्याने आज आयटी पार्क~~ हिंजवडी वाटर पार्क हिंजवडी झाल्याची वेळ ओढवली आहे. टेल्को रोड, लांडेवाडी, हिंजवडी या परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचलेले असल्याने नागरिकांची तारांबळ उडाली.

भोसरी परिसरातील शांतीनगर, गाव जत्रा मैदाना लगतचा रस्ता लांडेवाडी आणि भोसरी एमआयडीसी हद्दीत देखील काही मिनीटांच्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. सकाळी दहा वाजता अवघ्या 30 मिनिटांसाठी झालेल्या पावसाने प्रशासनाची पोलखोल झाल्याचे समोर आले. दोन्ही ठिकाणी नालेसफाई न झाल्याने ही अवस्था निर्माण झाली असल्याचे दिसून आले. पावसाळी नियोजनाच्या नावाखाली बैठका आणि कागदी घोडे नाचवणे एवढेच प्रकार सुरू असल्याचे मत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे. नागरिकांनी प्रशासनाच्या कारभारावरती संताप व्यक्त केला आहे.

### सुप्रिया सुळे यांची पोस्ट

हिंजवडी फेज २ परिसरामध्ये काही मिनीटामध्ये पावसामुळे जागोजागी पाणी साचले. प्रशासनाच्या या कारभारावरची खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील संताप व्यक्त केला आहे, त्यांनी सोशल मिडियावर पावसाचे, पाणी साचल्याचे व्हिडीओ टाकत पोस्ट लिहली आहे. "हिंजवडी फेज २ परिसरातील रायन इंटरनॅशनल स्कूलजवळ आणि इतर अनेक भागांत जोरदार पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साठले आहे.


या भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी व्यवस्था आहे की नाही अशी शंका येते. येथील नालेसफाईसारखी कामे वेळेत होण्याची गरज आहे. परंतु ही कामे वेळेत झालेली दिसत नाहीत.

महापालिका प्रशासन, एमआयडीसीने याबाबत तातडीने लक्ष घालून येथे भविष्यात पाणी साठून नागरीकांना त्याचा त्रास होऊ नये यासाठी दिर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज आहे." असे या पोस्टमध्ये सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

### नियोजनाचा फज्जा

मान्सूनच्या सुरुवातीलाच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजनाचा पुरता फज्जा पावसाने उडवला. जागोजागी पाणी साठलेले पाहायला मिळाले. रस्त्यांना नदीचे स्वरूप आले होते. मुख्यत्वे भोसरी, कासारवाडी, हिंजवडी, रावेत यांसारख्या भागामध्ये प्रचंड प्रमाणात रस्त्यांवर पाणी साचल्याने नागरिकांना मोठी कसरत करावी लागली. अनेक दुचाकी गाड्या जागोजागी बंद पडलेल्या दिसून आल्या. मनस्ताप झालेल्या नागरिकांनी प्रशासनाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला आहे.





## शहरातील पाच हाऊसिंग सोसायटीचे पाणी बंद

## एसटीपी बंद ; पालिका प्रशासनाकडून कारवाई

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांना सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक असतानाही १८४ सोसायट्यांमधील मैलासांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) बंद असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे. अशा हाऊसिंग सोसायट्यांचे नळजोड तोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. आत्तापर्यंत एकूण ५ हाऊसिंग सोसायट्यांचे नळजोड महापालिकेकडून खंडित करण्यात आले आहेत.**





महाराष्ट्र शासनाने २ डिसेंबर २०२० च्या नवीन एकत्रित बांधकाम विकास नियमावलीनुसार (यूडीसीपीआर) राज्यातील २० हजार चौरस मीटर, त्यावरील मोठ्या क्षेत्रफळाच्या बांधकामांना, १०० सदनिका असलेल्या दीड हजार चौरस मीटर बांधकाम असलेल्या किंवा दररोज २० हजार लिटर पाण्याचा वापर करणाऱ्या हाऊसिंग सोसायटी, शैक्षणिक संस्था, औद्योगिक, व्यापारी, सरकारी व निमसरकारी संस्था, हॉटेल, ग्रे वॉटर ट्रीटमेंटनुसार सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक केले आहे. एसटीपी न उभारणाऱ्या सोसायट्या आणि आस्थापनांवर कारवाईचे अधिकार महापालिकेस देण्यात आला आहे.

शहरात एकूण ४५६ मोठ्या हाऊसिंग सोसायट्या आहेत. यातील २६४ सोसायट्यांत एसटीपी सुरू आहेत. उर्वरित १८४ सोसाट्यांमधील एसटीपी विविध कारणांनी बंद आहेत. त्यांना वारंवार नोटीस बजावूनही प्रतिसाद दिला जात नाही. तर, ८ सोसायट्यांनी महापालिकेच्या पथकास सोसायटीमध्ये प्रवेश दिला नाही.

### एसटीपी बंद असल्यास कारवाई- कुलकर्णी

एसटीपी सुरू नसलेल्या हाऊसिंग सोसायट्यांचे पाणी १ जूनपासून तोडण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहेत. त्यानुसार पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडून कारवाईस 3 जूनपासून सुरुवात करण्यात आली आहे. 'ब' आणि 'क' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील प्रत्येकी २ 'फ' क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रातील एक हाऊसिंग सोसायटीचे नळजोड तोडण्यात आला आहे. नळजोड खंडित करण्याची कारवाई होऊ नये म्हणून हाऊसिंग सोसायट्यांनी तात्काळ एसटीपी सुरू करावेत, असे आवाहन मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी केले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नित्यनेम म्हणजे काय ?

नित्यनेम म्हणजे काय ? नित्याचा जो नियम तो खरा नित्यनेम होय. नित्य कोण ? जो कधीही बदलत नाही तो. याचा अर्थ, जो पूर्ण शाश्वत आहे तोच खरा नित्य होय. म्हणून नित्य म्हणजे भगवंत समजावा. त्याचा नियम करायचा म्हणजे काय करायचे ? नियम करणे याचा अर्थ नियमन करणे, निग्रह करणे, वश करून घेणे, स्वाधीन ठेवणे हा होय. आपले मन भगवंताच्या स्वाधीन करणे, त्याच्या ठिकाणी ते नेहमी ठेवणे याचे नाव नित्यनियम होय. आजच्या आपल्या मनाच्या अवस्थेमध्ये ते सर्वस्वी भगवंताच्या स्वाधीन करता येत नाही; आणि देह हा जड, अशाश्वत असल्यामुळे देहाने, नित्य आणि शाश्वत अशा भगवंताचा नियम घडणे शक्य नाही. म्हणून देहाने घेता येत असून देहाच्या पलीकडे असणारे, आणि सूक्ष्म असल्यामुळे भगवंताशी शाश्वत संबंध असणारे, असे भगवंताचे नाम अखंड घेणे हा आपला खरा नित्यनियम आहे. इतर सर्व गोष्टी, शास्त्राची बंधने, पोथी वगैरे वाचणे, स्नानसंध्यादि नित्यकर्मे वगैरे पाळावी पण त्याचा हट्ट वा आग्रह असू नये. कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे नाम मात्र सोडू नये. एवढाच हट्ट क्षम्य आहे. शुद्ध भावनेचे फळ फार मोठे आहे. पुष्कळ वेळा गरीब आणि अशिक्षित लोकच या बाबतीत श्रेष्ठ असतात. आपण नाम घेत जावे. नामाने भावना शुद्ध होत जाते. खरे म्हणजे, मनुष्याला जिवंत राहण्यासाठी हवेची जितकी जरुरी आहे तितकीच, किंबहुना त्याहूनही जास्त जरुरी, परमार्थामध्ये भगवंताच्या नामाची आहे. भगवंताच्या नामाशिवाय न राहण्याचा संकल्प प्रत्येक माणसाने केला पाहिजे. भगवंत हट्टाने किंवा उगीच केलेल्या कष्टाने साध्य होत नाही. तो एका प्रेमाने वश होतो. प्रेमामध्ये हट्ट आणि कष्ट झाले तर शोभतात, आणि हिताचे होतात. आपण भक्तांचे प्रेम न पाहता त्यांचा हट्ट आणि कष्ट तेवढे बघतो. जो मनुष्य साडेतीन कोटी रामनामाचा जप करील त्याला भगवंताच्या प्रेमाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही. शंका या फार चिवट असतात, त्या मरता मरत नाहीत. शिवाय, काही शंका आचरणाने आणि अनुभवानेच नाहीशा होतात. म्हणून, मनात शंका असल्या तरी नाम सोडू नये. सतत नाम घेत गेल्याने मन स्वच्छ होत जाते, आणि सर्व शंका आपोआप विरून जातात. लंकेमध्ये रावणाच्या बंदिवासात अशोकवनात सीता असताना, तिच्या सान्निध्याच्या प्रभावामुळे तिथली झाडे, नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे ह्यातच जीवनाचे सर्वस्व आहे.

**बोधवचन:- ध्रुवासारखी नामावर निष्ठा पाहिजे. प्रत्यक्ष भगवंत समोर आले, तरी त्याने नाम सोडले नाही.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**कोणत्याही देशासाठी नाही तर व्यक्तीसाठी स्वतःचा इतिहास अत्यंत महत्त्वाचा असतो आणि इतिहास नाकारणे तसेच आपल्या राष्ट्राच्या संस्थापकाला नाकारणे, हे आत्मघाती ठरते हे देखील इतिहासात नमूद झालेले आहे.**

# आपला इतिहास नाकारणे, हे तर आत्मघाती पाऊल!




### इतिहासाचा अत्यंत महत्त्वाचा..

आपण महाराष्ट्रात राहतो त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात डोकावले तर आपल्या राज्याची जडणघडण आपल्या राज्यात गाजलेली व्यक्तिमत्त्वे, स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचा सहभाग, हे प्रत्येक गावाचं माहीत असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे हे राज्य छत्रपती शिवरायांचे आहे, असे आपण जेव्हा म्हणतो त्यावेळी हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी छत्रपतींनी केलेल्या अतुलनीय कामगिरीचा अभ्यासही करणे महत्त्वाचे आहे.

### आता वळूया बांगलादेश कडे !

संपूर्ण जगात अस्वस्थ असलेला भाग म्हणजे दक्षिण आशिया! इथं भारत - पाकिस्तान मध्ये संघर्ष सुरू आहे. चीन खत पाणी घालत आहे, तिकडे श्रीलंका आणि म्यानमार या ठिकाणी हिंसक घटना घडत आहेत आणि मुख्य म्हणजे बांगलादेशात प्रचंड मोठ्या प्रमाणावर हिंसाचार तसेच उलथापालथ सुरू आहे. बांगलादेश ला किती कठीण प्रसंगातून जावे लागले याचाच विसर येथील राजकारण्यांना पडला असून त्या देशाची स्थापना करणाऱ्याचा विसर आणि तो संपूर्ण इतिहास बासनात गुंडाळला जात आहे.

### अत्यंत कोती वृत्ती, स्वार्थी कुठले ?

तर सांगण्याचा मुख्य मुद्दा म्हणजे बांगलादेशाचे सध्याचे नेतृत्व हेच करीत आहेत. या बांगलादेश या स्वतंत्र निर्मितीसाठी आणि पाकिस्तानच्या जोखडातून सुटण्यासाठी बंगबंधू शेख मुजीबूर रहमान यांनी अर्पण केलेले संपूर्ण जीवन हे सरकार विसरून गेले आहे. शेख मुजबूर रहमान यांचे पुतळे पाडल्यानंतर आता त्यांचा फोटो असलेल्या चलनी नोटा रद्द करण्यात आल्या आहेत आणि राष्ट्रपिता म्हणून त्यांना असलेला दर्जाही रद्द केलेला आहे.

### तर विध्वंस अटळ, दुसरे काय?

बांगलादेशच्या स्वातंत्र्यसैनिकांना मुक्ती युद्धाचे सहयोगी म्हटले जात होते. बांगलादेशात पाकिस्तानच नाही तर इतरही काही देश घाणेरडे राजकारण करीत आहेत. तेथे तर आता दहशतवादी वृत्तीने ही घुसखोरी केली आहे. ग्रामीण बँकेची संकल्पना मांडल्यानंतर अर्थशास्त्रात नोबेल पारितोषिक मिळविणारे मोहम्मद युनूस सध्या बांगलादेशचे प्रमुख आहेत. त्यांनी शेख मुजीबूर रहमान आणि त्यांच्या कुटुंबियांविरूद्ध शत्रुत्वाचा एक प्रकार अवलंबिला आहे, एव्हढेच नाही तर त्यांची भारतविरोधी वृत्तीही समोर आली आहे.

### परकीय शक्तीच्या हातातील बाहुले..

सध्याचे संपूर्ण राजकारण पाहता मोहम्मद युनूस परकीय शक्तीच्या हातातील बाहुले बनले आहेत. युनूस एकीकडे पाकिस्तानशी मैत्री वाढवित आहेत, तर दुसरीकडे चीनच्या मांडीवर जाऊन बसले आहेत. ज्या पाकिस्तानच्या सैन्याने बांगलादेशी नागरिकांवर अमानुष अत्याचार केले होते, ज्यांच्या लष्कराने तेथील महिलावर बलात्कार केले होते, त्यांच्यासोबत युनूस आणि त्यांचे सरकार मैत्री करीत आहेत. एकेकाळी जनरल टिक्काखान म्हणाले होते की, मी बांगलादेशींचा वंशच संपवून टाकेन. पूर्व पाकिस्तानला स्वतंत्र बांगलादेश बनविण्यात आणि इस्लामाबादच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यात भारताचे ऐतिहासिक आणि अमूल्य योगदान असून तेथील सध्याचे नेतृत्व ते विसरले आहे. ही पराकोटीची कृतघ्नता आहे, असेच म्हणावे लागेल.

### युनूस यांचे थेट चीनलाच निमंत्रण..

मोहम्मद युनूस यांनी चीनला बांगलादेश विकसित करण्याचे निमंत्रणही दिले आणि म्हटले की, ईशान्य भारतावर कब्जा करून चीन बांगलादेशच्या चितगाव बंदरात प्रवेश मिळवू शकतो. भारताने आश्रय दिलेल्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना बांगलादेश सरकार मृत्यूदंड देऊ इच्छिते. किंबहुना त्याची तयारी देखील झाली आहे. मोहम्मद युनूस सत्तेला चिकटून आहेत आणि त्यांना बांगलादेशात निवडणुका घ्यायच्या नाहीत. अशा परिस्थितीत त्यांचा सामना बांगलादेश आर्मी किंवा बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या प्रमुख खलिदा झिया यांच्याशी होईल, याची त्यांना भीती वाटत आहे.

### युनूस यांना प्रतिकूल वातावरण..

बांगला देश ज्या मार्गावर वाटचाल करीत आहे, त्याचे दीर्घकालीन परिणाम होतील आणि ते त्यांच्या विरोधात जातील. कट्टरपंथीयांच्या वाढत्या प्रभावामुळे, लवकरच ते त्यांची लोकशाही गमावू शकते. भारताशी संघर्षाचा मार्ग युनूस यांच्यासाठी खूप महागात पडू शकतो.

### भारताने धाकटा भाऊ मानले..

बांगलादेशात कोणतेही सरकार सत्तेवर आले तरी, त्यांना हे समजून घ्यावे लागेल की, भारतासारख्या मोठ्या शेजारी देशाशी सहकार्य करणे, व्यापार वाढवून फायदा करून घेणे आणि चांगले संबंध ठेवणे, हे त्यांच्या हिताचे आहे. बांगलादेशला भारताने नेहमीच आपला एक लहान भाऊ समजून सर्वांग मदत केली. या मदतीची परतफेड न भूतो न भविष्यती स्वरूपाची आहे. हे सांगण्याची तशी गरजच नाही. पण बांगलादेशच्या सत्ताधाऱ्यांचे वर्तमान वर्तन पाहता हा उल्लेख आपसूकच मनात येतो हे तेवढेच खरे आहे.

### भारताबरोबरचा पंगा लढणार..

बांगलादेशातील उठावानंतर पंतप्रधान शेख हसीना यांना भारताने आश्रय दिला, याचा मनस्वी राग तेथील सत्ताधाऱ्यांना आहे. भारतावरील हा राग तेथील हिंदूंची कत्तल करून आणि महिलांवर बलात्कार करून तथाकथित दहशतवादी व्यक्त करीत आहेत. इतिहास विसरणारे हे बांगलादेशी निवडणुका जवळ आल्या असल्याने खाडकन डोळे उघडून जागे होतील आणि शेवटी लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करतील. सध्या तरी त्यांना भारताशिवाय तरणोपाय नाही, याचा विचार मात्र तेथील ज्येष्ठ नागरिक आणि स्थानिकांनी करायला हवा, याशिवाय दुसरे उत्तर दिसत नाही !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पाच महिन्यांत 30 लाख मतदार वाढलेले!

## महसूल मंत्र्यांचा राहुल गांधींवर पलटवार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठा गैरव्यवहार झाल्याचा दावा केला आहे. त्यांनी निवडणूक आयोग व केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. दी इंडियन एक्सप्रेसमध्ये त्यांनी एक लेख लिहून मॅच फिक्सिंग, बोगस मतदान ते पुरावे लपवणे यासह पाच मुद्दे उपस्थित करत सरकारवर आरोप केले आहेत. त्यावर केंद्रातील तसेच महाराष्ट्रातील भाजपा नेत्यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. राज्याचे महसूल मंत्री व भाजपा नेते चंद्रशेखर यांनी राहुल गांधी यांच्या पाचपैकी एका आरोपाला उत्तर दिलं आहे.**



राहुल गांधी यांनी त्यांच्या लेखात म्हटलं आहे की निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात नोंदणीकृत मतदारांची संख्या ८ कोटी ९८ लाख इतकी होती, जी पाच वर्षांनंतर मे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ९ कोटी २९ लाख इतकी झाली. मात्र, केवळ पाच महिन्यांनंतर, म्हणजेच नोव्हेंबर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत राज्यातील नोंदणीकृत मतदारांची संख्या ९ कोटी ७० लाखांवर पोहोचली. म्हणजे पाच वर्षांत ३१ लाखांची वाढ, त्यानंतर केवळ पाच महिन्यांत ४१ लाख मतदारांची वाढ! ही वाढ अतिशय अविश्वसनीय होती. राहुल गांधी यांच्या केंद्र सरकार व निवडणूक आयोगाच्या संगनमताने बोगस मतदारांनी मतदारयादी फुगवल्याच्या आरोपावर बावनकुळे यांनी उत्तर दिलं आहे. त्यांनी याबाबत एक्सवर या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे.चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की “राहुल गांधी म्हणतात महाराष्ट्रात ५ महिन्यांत ३९ लाख मतदारांची वाढ ‘संशयास्पद’ आहे. पण राहुलजी २००९ ला काय झालं होतं? तुम्हाला आठवत नसेल तर मी सांगतो.एप्रिल २००९ ला लोकसभा निवडणुकीत ७ कोटी २९ लाख ५४ हजार मतदार होते. तर ऑक्टोबर २००९ ला विधानसभा निवडणुकीत ७ कोटी ५९ लाख ६८ हजार मतदार झाले. तेव्हाही फक्त ५ महिन्यांत ३० लाख मतदार वाढले होते! तेव्हा तुमचा निवडणूक आयोगावर विश्वास होता की तेव्हाही काँग्रेस-आयोग युतीच होती? तेव्हा तुम्ही घोटाळा केला होता का? याचं उत्तर द्या”.महसूल मंत्री बावनकुळे राहुल गांधी यांना उद्देशून म्हणाले, २००४, २००९ ला जिंकलात तेव्हा काही प्रश्न पडले नाहीत! आज पराभव झाला, महाराष्ट्रातील जनतेनं तुम्हाला झिडकारलं तेव्हा रडगाणं सुरू झालं. राहुलजी आकड्यांचं अर्धवट वाचन करून देशाला गोंधळात टाकण्याचा निरर्थक प्रयत्न करू नका. स्वतःचं अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आत्मपरीक्षण करा. महाराष्ट्रातील जनतेनं तुम्हाला नाकारलं, आता बिहारमधील जनताही तुम्हाला हद्दपार करणार आहे. त्याच भीतीतून तुम्ही आतापासून पराभवाचं कारण देत आहाआहे की निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात नोंदणीकृत मतदारांची संख्या ८ कोटी ९८ लाख इतकी होती,.

### जनताही तुम्हाला हद्दपार करणार

जी पाच वर्षांनंतर मे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ९ कोटी २९ लाख इतकी झाली. मात्र, केवळ पाच महिन्यांनंतर, म्हणजेच नोव्हेंबर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत राज्यातील नोंदणीकृत मतदारांची संख्या ९ कोटी ७० लाखांवर पोहोचली. म्हणजे पाच वर्षांत ३१ लाखांची वाढ, त्यानंतर केवळ पाच महिन्यांत ४१ लाख मतदारांची वाढ! ही वाढ अतिशय अविश्वसनीय होती.राहुल गांधी यांच्या केंद्र सरकार व निवडणूक आयोगाच्या संगनमताने बोगस मतदारांनी मतदारयादी फुगवल्याच्या आरोपावर बावनकुळे यांनी उत्तर दिलं आहे. त्यांनी याबाबत एक्सवर या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे.चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की “राहुल गांधी म्हणतात महाराष्ट्रात ५ महिन्यांत ३९ लाख मतदारांची वाढ ‘संशयास्पद’ आहे.

# सातारा जिल्ह्यात पावसाची जोरदार हजेरी

## ढगांच्या गडगडात पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सातारा शहरासह जिल्ह्यात विजांच्या कडकडाटात, ढगांच्या गडगडात पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. तासभर पडलेल्या या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले. ओढे-नाले तुडुंब भरून वाहिले. लिंब-बसाप्पाचीवाडी रस्ता पाण्याखाली गेला. दरम्यान, अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली.**



वाई शहर व तालुक्यात दुपारी ढगफुटीसदृश पाऊस झाला. वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळला. अचानक आलेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे बागायती क्षेत्राचे फार मोठे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे आंब्यासह इतर फळांचे मोठे नुकसान झाले. पावसामुळे केळीच्या बागांचे मोठे नुकसान झालेले आहे. विजेचे खांब आडवे झाल्याने चार तास वीज गायब होती. जनजीवन विस्कळीत झाले. या पावसाने बाजारपेठेतील व्यावसायिकांची त्रेधातिरपीट उडाली.सातारा शहरासह जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून दुपारच्या वेळी पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत. शहर व परिसरातील रस्त्यावरून पाण्याचे लोटच्या लोट वाहताना दिसत होते.

सखल भागात जोरदार पावसाने ओढ्याला पूर येत पूल पाण्याखाली गेला. अचानक आलेल्या पावसामुळे शहर व परिसरासह बाजारपेठेत खरेदीसाठी आलेल्या व्यापारी, नागरिकांची तारांबळ उडाली. अनेक रस्ते जलमय झाले. त्यामुळे वाहनधारकांना कसरत करावी लागली.सध्या ग्रामीण भागात खरीप हंगामाच्या मशागतीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या पावसामुळे केळीच्या बागांचे मोठे तर जिल्ह्याच्या पश्चिम भागात धूळवाफेवर पेरण्याची कामे सुरू आहेत. तर काही ठिकाणी भात लागणीसाठी भाताचे तरवे टाकण्याचे काम सुरू आहे. अधूनमधून येणाऱ्या पावसामुळे शेतात पाणी साचले आहे.पावसामुळे बहुतांश ठिकाणी भुईमूग काढणी लांबली असल्याने शेंगांना कोंब फुटले आहेत

### केळीच्या बागांचे मोठे नुकसान

. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक वाया गेले आहे. या पावसामुळे शेतात सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. तसेच उन्हाळी ढोबळी मिरची, भुईमूग, काकडी, टोमॅटो, भाजीपाला या पिकांना पावसाचा फटका बसला.वाई शहर व तालुक्यात दुपारी ढगफुटीसदृश पाऊस झाला. वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळला. अचानक आलेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे बागायती क्षेत्राचे फार मोठे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे आंब्यासह इतर फळांचे मोठे नुकसान झाले. पावसामुळे केळीच्या बागांचे मोठे नुकसान झालेले आहे. या पावसाने बाजारपेठेतील व्यावसायिकांची त्रेधातिरपीट उडाली.सातारा शहरासह जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून दुपारच्या वेळी पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत.

# पाचवी अर्थव्यवस्था असल्याने आमंत्रण!

## मोदींच्या निमंत्रणावरून कॅनडाच्या पंतप्रधानांचा खुलासा

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत ही जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असल्यामुळे जी-७ शिखर परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रण दिल्याचा खुलासा कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी शुक्रवारी केला. कॅनडातील अल्बर्टा येथे १५ ते १७ जून यादरम्यान ही शिखर परिषद होत आहे. या परिषदेला उपस्थित राहण्यासाठी कार्नी यांनी मोदी यांना आमंत्रित केले असून मोदी यांनी या आमंत्रणाचा स्वीकार केला आहे.**



कॅनडाचे माजी पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्या कार्यकाळात दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यांच्यानंतर पंतप्रधान झालेल्या कार्नी यांनी हे संबंध सुधारण्याचा प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र, भारताला जी-७ शिखर परिषदेचे आमंत्रण मिळण्यास उशीर झाल्यामुळे मोदी कॅनडाला जाणार की नाही याबद्दल साशंकता निर्माण झाली होती. यादरम्यान, शुक्रवारी कॅनडाकडून आमंत्रण देण्यात आले आणि ते स्वीकारले असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी जाहीरही केले.ओट्टावा येथील पार्लमेंट हिल येथे पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदी यांना पाठवलेल्या आमंत्रणाबद्दल प्रश्न विचारले असता कार्नी यांनी उत्तर दिले की, जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आणि पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था जी-७ला उपस्थित असायला हवी. जी-७ गटाचा अध्यक्ष म्हणून ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, महत्त्वाची खनिजे यासारख्या महत्त्वाच्या विषयांवरील चर्चांना उपस्थित राहण्यासाठी सर्वात महत्त्वाच्या देशांना आमंत्रित करणे महत्त्वाचे आहे. भारत हा जागतिक साखळी पुरवठ्याच्या खरोखर केंद्रस्थानी असलेला देश आहेकॅनडाचे माजी पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्या कार्यकाळात दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यांच्यानंतर पंतप्रधान झालेल्या कार्नी यांनी हे संबंध सुधारण्याचा प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र, भारताला जी-७ शिखर परिषदेचे आमंत्रण मिळण्यास उशीर झाल्यामुळे मोदी कॅनडाला जाणार की नाही याबद्दल साशंकता निर्माण झाली होती. यादरम्यान, शुक्रवारी कॅनडाकडून आमंत्रण देण्यात आले आणि ते स्वीकारले असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी जाहीरही केले.ओट्टावा येथील पार्लमेंट हिल येथे पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदी यांना पाठवलेल्या आमंत्रणाबद्दल प्रश्न विचारले असता कार्नी यांनी उत्तर दिले की, जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आणि पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था जी-७ला उपस्थित असायला हवी. जी-७ गटाचा अध्यक्ष म्हणून ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, महत्त्वाची खनिजे यासारख्या महत्त्वाच्या विषयांवरील चर्चांना उपस्थित राहण्यासाठी सर्वात महत्त्वाच्या देशांना आमंत्रित करणे महत्त्वाचे आहे. भारत हा जागतिक साखळी पुरवठ्याच्या खरोखर केंद्रस्थानी असलेला देश आहेभारत ही जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असल्यामुळे जी-७ शिखर परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रण दिल्याचा खुलासा कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनी शुक्रवारी केला. कॅनडातील अल्बर्टा येथे १५ ते १७ जून यादरम्यान ही शिखर परिषद होत आहे. या परिषदेला उपस्थित राहण्यासाठी कार्नी यांनी मोदी यांना आमंत्रित केले असून मोदी यांनी या आमंत्रणाचा स्वीकार केला आहे.

### मोदी कॅनडाला जाणार

कॅनडाचे माजी पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्या कार्यकाळात दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यांच्यानंतर पंतप्रधान झालेल्या कार्नी यांनी हे संबंध सुधारण्याचा प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र, भारताला जी-७ शिखर परिषदेचे आमंत्रण मिळण्यास उशीर झाल्यामुळे मोदी कॅनडाला जाणार की नाही याबद्दल साशंकता निर्माण झाली होती. यादरम्यान, शुक्रवारी कॅनडाकडून आमंत्रण देण्यात आले आणि ते स्वीकारले असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी जाहीरही केले.ओट्टावा येथील पार्लमेंट हिल येथे पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदी यांना पाठवलेल्या आमंत्रणाबद्दल प्रश्न विचारले असता कार्नी यांनी उत्तर दिले .

# आपत्ती-प्रतिरोधक पायाभूत सुविधांवर भर

## आंतरराष्ट्रीय परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदीची पंचसूत्री

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी आपत्ती-प्रतिरोधक पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी पाच प्रमुख जागतिक प्राधान्यक्रम अधोरेखित केले. यामध्ये कुशल कर्मचारी वर्ग, सर्वोत्तम पद्धतींचे दस्तऐवजीकरण, जागतिक डिजिटल संग्रह आणि नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यांचा समावेश आहे.**




आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांवरील आंतरराष्ट्रीय परिषदेला दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करताना पूर्वसूचना प्रणाली आणि समन्वय राखणे हा महत्त्वाचा पैलू असल्याचे पंतप्रधान म्हणाले.भारताने २९ देशांना फायदा देणारी त्सुनामी-इशारा प्रणाली स्थापित केली असल्याची माहिती देतानाच लहान बेट असलेल्या विकसनशील देशांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचेही पंतप्रधान म्हणाले. युरोपमध्ये प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाबद्दल मोदींनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल माक्रॉं यांचे आभार मानले आणि आगामी संयुक्त राष्ट्र महासागर परिषदेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.संबोधनादरम्यान पंतप्रधानांनी नैसर्गिक आपत्ती आणि हवामान बदलासाठी किनारी क्षेत्रे आणि बेटांची असुरक्षितता अधोरेखित केली. यावेळी त्यांनी भारत आणि बांगलादेशसह अन्य देशांतील चक्रीवादळांसारख्या आपत्तींचा दाखलाही दिला. आपत्तीच्या प्रतिकारशक्तीसाठी वित्तपुरवठा आवश्यक असल्याचे सांगतानाच विकसनशील देशांना आवश्यक निधी उपलब्ध व्हावा यासाठी कृतिशील कार्यक्रमांचे आवाहन पंतप्रधानांनी या वेळी केले. तसेच पूर्वसूचना प्रणाली आणि समन्वय मजबूत करण्याची गरज अधोरेखित केली.आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांवरील आंतरराष्ट्रीय परिषदेला दूरदृश्य प्रभारताने २९ देशांना फायदा देणारी त्सुनामी-इशारा प्रणाली स्थापित केली असल्याची माहिती देतानाच लहान बेट असलेल्या विकसनशील देशांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचेही पंतप्रधान म्हणाले.

### किनारी क्षेत्रे आणि बेटांची असुरक्षितता

युरोपमध्ये प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाबद्दल मोदींनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल माक्रॉं यांचे आभार मानले आणि आगामी संयुक्त राष्ट्र महासागर परिषदेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.संबोधनादरम्यान पंतप्रधानांनी नैसर्गिक आपत्ती आणि हवामान बदलासाठी किनारी क्षेत्रे आणि बेटांची असुरक्षितता अधोरेखित केली. यावेळी त्यांनी भारत आणि बांगलादेशसह अन्य देशांतील चक्रीवादळांसारख्या आपत्तींचा दाखलाही दिला.आपत्तीच्या प्रतिकारशक्तीसाठी वित्तपुरवठा आवश्यक असल्याचे सांगतानाच विकसनशील देशांना आवश्यक निधी उपलब्ध व्हावा यासाठी कृतिशील कार्यक्रमांचे आवाहन पंतप्रधानांनी या वेळी केले.

# जलद जेवणे आणि बसणेही धोकादायक

बॉलीवूडची धकधक गर्ल माधुरी दीक्षित ही तिच्या सदाबहार सौंदर्याने आणि अभिनयाने कायमच चर्चेत राहत असते. पण तिच्याबरोबरच तिचे पती म्हणजेच डॉ. श्रीराम नेनेदेखील चर्चेत राहत असतात. ते हृदयरोग शल्यचिकित्सक आहेत. त्यांचं स्वत:च युट्यूब चॅनेल आहे. याद्वारे ते आरोग्य व जीवनशैलीचे व्हिडीओ शेअर करत असतात. अशातच त्यांनी रोजच्या अशा सवयींबद्दल सांगितलंय, ज्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपण्यापर्यंतच्या लोकांच्या एकूण दिनचर्येबद्दलचा व्हिडीओ त्यांनी शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ते म्हणतात, "स्नूझ (तात्पुरते बंद होऊन पुन्हा वाजणे) अलार्म वाजवल्याने तुमच्या गाढ झोपेमध्ये व्यत्यय येतो. त्यामुळे स्नूझ अलार्म लावणं बंद करा. व्यवस्थित झोपा आणि व्यवस्थित उठा." यासाठी त्यांनी झोपेपुर्वी मोबाइल न वापरण्याचा सल्लाही दिला आहे.बॉलीवूडची धकधक गर्ल माधुरी दीक्षित ही तिच्या सदाबहार सौंदर्याने आणि अभिनयाने कायमच चर्चेत राहत असते. पण तिच्याबरोबरच तिचे पती म्हणजेच डॉ. श्रीराम नेनेदेखील चर्चेत राहत असतात. ते हृदयरोग शल्यचिकित्सक आहेत. त्यांचं स्वत:च युट्यूब चॅनेल आहे. याद्वारे ते आरोग्य व जीवनशैलीचे व्हिडीओ शेअर करत असतात. अशातच त्यांनी रोजच्या अशा सवयींबद्दल सांगितलंय, ज्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपण्यापर्यंतच्या लोकांच्या एकूण दिनचर्येबद्दलचा व्हिडीओ त्यांनी शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये ते म्हणतात, "स्नूझ (तात्पुरते बंद होऊन पुन्हा वाजणे) अलार्म वाजवल्याने तुमच्या गाढ झोपेमध्ये व्यत्यय येतो. त्यामुळे स्नूझ अलार्म लावणं बंद करा. व्यवस्थित झोपा आणि व्यवस्थित उठा." यासाठी त्यांनी झोपेपुर्वी मोबाइल न वापरण्याचा सल्लाही दिला आहे.



# आलिया भट्टची खास पोस्ट

अभिनेता रणबीर कपूर यांची मुलगी राहाचा आज पहिला वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त कपूर कुटुंबीयांनी सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर केला आहेत. आता लेकीच्या वाढदिवसानिमित्त आलियानं नुकतीच एक स्पेशल पोस्ट शेअर केली आहे. आलियानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोंनी अनेकांचे लक्ष वेधले आहेत. आलिया भट्टनं सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत. या फोटोमध्ये राहानं एका केकवर हात ठेवलेला दिसत आहे. तर दुसऱ्या फोटोमध्ये राहानं हातात फुल धरलेलं दिसत आहे. आलियानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोमध्ये राहाचा चेहरा दिसत नाहीये. आलियानं फोटोला कॅप्शन दिलं, "आमचा आनंद, आमचं आयुष्य आणि आमच्या जीवनातील प्रकाश, आपण हे गाणं ऐकत आहोत आणि तू माझ्या पोटात लाथा मारत आहेस, हे सर्व परवा घडलं असं मला वाटत आहे. माझ्याकडे भावना मांडण्यासाठी शब्द नाहीत पण तू आमच्या आयुष्यात आहेस, हे आमचं भाग्य आहे. तू आम्हाला एका चविष्ट केकच्या तुकड्याप्रमाणे वाटत आहेस. वाढदिवसाच्या शुभेच्छा बेबी टायगर, आम्ही तुझ्यावर खूप प्रेम करतो." राहाची आजी नीतू कपूर आणि सोनी राजदान यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट शेअर केल्या आहेत. आलियाची आई सोनी राजदान यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये लिहिलं आहे.

# सोनाली बेंद्रे कुटुंबाचे ठाकरेंच्या कुटुंबाशी कनेक्शन आहे

बॉलीवूड अभिनेत्री सोनाली बेंद्र व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काही महिन्यांपूर्वी एका कार्यक्रमाला हजेरी लावली होती. त्या कार्यक्रमातील दोघांचा एक व्हिडीओ चांगलाच व्हायरल झाला होता. त्यानंतर राज ठाकरे यांचा २० वर्षांपूर्वी सोनालीवर क्रश होता, अशा चर्चा रंगल्या होत्या. आता सोनाली बेंद्रेने यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरे व तिच्याबद्दल सुरू असलेल्या चर्चा सोनाली बेंद्रेने फेटाळून लावल्या. एएनआयशी बोलताना सोनालीला त्यासंदर्भात विचारण्यात आलं."खरंच का...



मला शंका आहे का," असं म्हणत तिने त्या व्हिडीओबद्दल स्पष्टीकरण दिलं, ज्यात ती राज ठाकरेंना इशारा करतेय असं म्हटलं जात होतं. सोनाली म्हणाली, "मी माझ्या बहिणीशी बोलत होते, तीही तिथेच होती."सोनाली बेंद्रे म्हणाली की तिच्या व राज ठाकरेंच्या कुटुंबाचे संबंध खूप जुने आहेत. "माझे भाऊजी एक क्रिकेटपटू आहेत आणि ते राज यांच्या चुलत बहिणीच्या पतीबरोबर क्रिकेट खेळायचे. ते नेहमीच एकत्र खेळायचे. दुसरं म्हणजे, माझ्या बहिणीच्या सासूबाई एचओडी होत्या, त्या आम्हाला रुईया कॉलेजमध्ये इंग्रजी साहित्य शिकवायच्या," असं सोनालीने नमूद केलं.सोनाली कौटुंबिक संबंधांबद्दल म्हणाली, "अशा रितीने ते सर्व एकमेकांना ओळखत होते. माझ्यासाठी, नातं असं होतं की राज यांची पत्नी शर्मिला, त्यांची आई आणि माझी मावशी या खूप जवळच्या मैत्रिणी होत्या. ते सगळे मला रुग्णालयात बघायला आले होते आणि शर्मिला यांच्या आईने मला १० दिवस सांभाळलं होतं."सोनाली बेंद्रे म्हणाली, "मी नेहमीच फिरत असायचे. त्यामुळे मी त्यांना एका मर्यादेपलीकडे ओळखत नाही.

# लहान मुलांच्या गोष्टी सांगणारे चित्रपट वाढण्याची गरज

मुलांच्याच आयुष्यातील महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श करणारा, पालक आणि मुलांमधील संवादाचं महत्त्व पटवून देणाऱ्या 'तारे जमीन पर' या चित्रपटाचं दिग्दर्शन आमिर खानने २००७ साली केलं होतं. त्यानंतर 'सिक्रेट सुपरस्टार' या चित्रपटाची निर्मिती केली. आता तो पुन्हा एकदा लहान मुलांनाच एकत्र घेऊन केलेला 'सितारे जमीन पर' हा चित्रपट घेऊन प्रेक्षकांसमोर येतो आहे. यानिमित्ताने, बोलताना लहान मुलांवरील चित्रपटांना प्रेक्षकांचा कमी प्रतिसाद मिळतो हा गैरसमज हिंदी चित्रपटसृष्टीत दृढ झाला आहे, असं सांगतानाच आपल्याकडे लहान मुलांच्या गोष्टी सांगणाऱ्या चित्रपटांची निर्मिती अधिक व्हायला पाहिजे, असं मत आमिरने व्यक्त केलं. 'सितारे जमीन पर' या २० जूनला प्रदर्शित होत असलेल्या चित्रपटाच्या निमित्ताने प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधताना त्याने लहान मुलांवरच्या चित्रपटांची आवश्यकता का आहे याविषयी सविस्तर मत मांडलं. 'सध्या हिंदी चित्रपटसृष्टीत लहान मुलांवर फार कमी चित्रपट बनतात. सध्याची लहान मुलं अनेक परदेशी भाषांमधील विविध कलाकृती मोठ्या प्रमाणात पाहतात, हिंदीमध्ये



डब केलेल्या परदेशी कलाकृतीही मुलं पाहतात. हेच लक्षात घेऊन आपण त्यांच्यासाठी खास भारतीय धाटणीतील चित्रपटांची निर्मिती केली तर लहान मुलं आणि त्यांच्या पालकांच्या प्रतिसादामुळे चित्रपटसृष्टीची आर्थिक बाजू भक्कमच होईल' असा स्पष्ट मुद्दा आमिरने मांडला. भविष्यात 'महाभारता'वर काही तरी मोठं करण्याची इच्छा असल्याचं आणि त्याविषयी सर्व गोष्टी निश्चित ठरल्या की त्याविषयी अधिकृतरीत्या माहिती देण्याचं आश्वासनही त्याने दिलं.विशेष मुलांमुळे सेटवर सकारात्मक ऊर्जा आणि चैतन्यमय वातावरण मी गेली ३० ते ३५ वर्षे सर्वसाधारण माणसांसोबत काम करत आलो आहे. 'सितारे जमीन पर' चित्रपटाच्या निमित्ताने विशेष मुलांसोबत काम करण्याची संधी मिळाली, मात्र या चित्रपटात विशेष मुलांनीही सर्वसाधारण कलाकारांप्रमाणेच काम केलं आहे. या सर्व मुलांमुळे सेटवर एक सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली होती. अनेकदा सेटवरील तंत्रज्ञांमध्ये छोटे – मोठे वाद होतात, पण 'सितारे जमीन पर' चित्रपटादरम्यान कोणतेही वाद झाले नाहीत. कारण या विशेष मुलांच्या सहवासामुळे सर्व कलाकार व तंत्रज्ञ ताणतणाव विसरून जायचे, अशी आठवण आमिरने सांगितली. 'आपल्याकडे आयुष्यात सगळ्या गोष्टी असल्या तरी आपण छोट्या छोट्या गोष्टींवरून दु:खी होतो, नाराज असतो, मात्र ही मुलं कोणत्याही क्षणी आनंदी असतात, त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत खूश राहायचं, हे मी या मुलांकडून शिकलो आहे, असंही त्याने सांगितलं.

# विराट कोहलीविरुद्ध गुन्हा दाखल ?

## पोलिसांनी दिलं उत्तर;कोणत्या अधिकाऱ्यांना अटक केली?

| नवी दिल्ली| प्रतिनिधी : महाईन्यूज |

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने १८ वर्षांच्या मोठ्या प्रतिक्षेनंतर आयपीएलचे जेतेपद आपल्या नावे केले. विराट कोहलीने आनंदाश्रूंनी हा विजय साजरा केला. आरसीबीच्या चाहत्यांबरोबर या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी संघ बंगळुरूसाठी दुसऱ्या दिवशी रवाना झाला. यादरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरीची मोठी घटना घडली, ज्यामध्ये अनेकांचा मृत्यू झाला.**






४ जून रोजी बेंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण जखमी झाले आहेत. या प्रकरणात भारतीय क्रिकेटपटू आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाचा सदस्य विराट कोहलीविरुद्धही तक्रार दाखल करण्यात आली आहे. ही तक्रार सामाजिक कार्यकर्ते एचएम वेंकटेश यांनी बेंगळुरूमधील क्यूबन पार्क पोलिस स्टेशनमध्ये दाखल केली आहे. पण पोलिसांनी अद्याप एफआयआर नोंदवलेला नाही.बेंगळुरूच्या क्यूबन पार्क पोलिस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारीत व्यंकटेश यांनी आरोप केला आहे की कोहलीने आयपीएलमध्ये "जुगाराला प्रोत्साहन दिले" आणि यामुळे लोकांना मोठ्या संख्येने जमण्यास भाग पाडले, ज्यामुळे चेंगराचेंगरी झाली. "आयपीएल हा खेळ नाही तर जुगाराचा एक प्रकार आहे ज्याने क्रिकेटला भ्रष्ट केलं आहे. विराट कोहली हा आरसीबी संघाचा सर्वात प्रमुख चेहरा आहे आणि तो या जुगारात सामील आहे," असे व्यंकटेश म्हणाले. कोहली आणि त्याच्या संघावर कायदेशीर कारवाई केली पाहिजे. एएनआय वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, विराट कोहलीविरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीचा आढावा सध्याच्या प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून घेतला जाईल. त्याच्याविरुद्ध अद्याप वेगळा एफआयआर दाखल केलेला नाही. या प्रकरणात आतापर्यंत एकूण चार जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये आरसीबीचे वरिष्ठ अधिकारी निखिल सोसाळे आणि इव्हेंट मॅनेजमेंटशी संबंधित तीन जणांचा समावेश आहे. क्यूबन पार्क पोलिस आणि सेंट्रल क्राइम ब्रांच (सीसीबी) यांनी संयुक्त कारवाईत ६ जून रोजी सकाळी केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून त्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर, वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना सत्र न्यायालयात हजर करण्यात आले, जिथे त्यांना १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.५ जून रोजी पोलिसांनी आरसीबी फ्रँचायझी, इव्हेंट कंपनी डीएनए एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन (केएससीए) विरुद्ध हत्येचा प्रयत्न, बेकायदेशीर जमवाजमव आणि इतर गंभीर आरोपांखाली एफआयआर दाखल केला होता. त्यानंतरच अटकेची कारवाई करण्यात आली.कर्नाटक उच्च न्यायालयाने केएससीए अधिकाऱ्यांना अंतरिम दिलासा दिला आहे.च्च न्यायालयाने राज्य पोलिसांना सध्या त्यांच्याविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई करू नये असे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी ९ जून रोजी होणार आहे.

### कोहलीविरुद्धही तक्रार दाखल

आरसीबीचे अटक झालेले अधिकारी निखिल सोसाळे यांनीही उच्च न्यायालयात याचिका दाखल करून त्यांची अटक बेकायदेशीर ठरवली आहे. त्यांनी म्हटले आहे की, कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय किंवा प्राथमिक तपासाशिवाय ही अटक करण्यात आली आहे आणि ती रद्द करण्यात यावी.४ जून रोजी बेंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे आणि अनेक जण जखमी झाले आहेत. या प्रकरणात भारतीय क्रिकेटपटू आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाचा सदस्य विराट कोहलीविरुद्धही तक्रार दाखल करण्यात आली आहे. ही तक्रार सामाजिक कार्यकर्ते एचएम वेंकटेश यांनी बेंगळुरूमधील क्यूबन पार्क पोलिस स्टेशनमध्ये दाखल केली आहे. पण पोलिसांनी अद्याप एफआयआर नोंदवलेला नाही.बेंगळुरूच्या क्यूबन पार्क पोलिस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारीत व्यंकटेश यांनी आरोप केला आहे.

# रोहित भाई गार्डनमध्ये फिरतोय!

## ऋषभ पंतचं रोहित शर्मासंबंधित प्रश्नावर भलतंच उत्तर

| नवी दिल्ली | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**भारतीय संघ आयपीएल २०२५ नंतर आता इंग्लंड दौऱ्यासाठी रवाना झाला आहे. ५ जून रोजी नव्या कसोटी कर्णधारासह भारतीय संघ इंग्लंडसाठी निघाला. काही खेळाडू तिथे आधीच पोहोचले होते, उर्वरित खेळाडू आता इंग्लंडच्या भूमीवर दाखल झाले आहेत. बीसीसीआयने भारतीय संघाच्या प्रवासाचा व्हीडिओही शेअर केला आहे.**



भारतातून रात्री रवाना होताना उपकर्णधार ऋषभ पंतला रोहित शर्माबाबत प्रश्न विचारण्यात आला, यावर पंतने भन्नाट उत्तर दिलं. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना २० जूनपासून खेळवला जाणार आहे. तर तत्पूर्वी भारताच्या अ संघाविरूद्ध टीम इंडिया सराव सामनाही खेळणार आहे यासाठी टीम इंडियाचे खेळाडू, कर्णधार शुबमन गिल आणि उपकर्णधार ऋषभ पंतसह मुंबईहून रवाना झाले.

यादरम्यान काही चाहते तिथे पोहोचले.ऋषभ पंत टीम बसमधून तिथे उतरला तेव्हा चाहत्यांनी त्याला विचारलं की "रोहित शर्मा सर कुठे आहेत?" ज्यावर ऋषभ पंतने उत्तर दिले की "रोहित भाई गार्डनमध्ये फिरत आहे". यावर पंतला विचारलं की त्याला गार्डनची आठवण येईल की नाही?, यावर पंत लगेच म्हणाला, "अरे गार्डनची तर खूप आठवण येईल."रोहित शर्मा भारतीय कसोटी संघाचा कर्णधार होता, तेव्हा त्याने सामन्यादरम्यान खेळाडूंना फटकारले आणि त्यांना ओरडत ताकिद दिली होती की, कोणी गार्डनमध्ये फिरलं तर बघा. रोहित शर्माचं हे ओरडणं स्टम्प माईकवर रेकॉर्ड झालं होतं आणि त्यावेळी हा व्हिडिओ व्हायरल झाला होता. यानंतर रोहित शर्माचं हे वाक्य प्रसिद्ध झालं आहे. पंत याच गार्डनविषयी बोलत होता. मुंबई एअरपोर्टवरील हा व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.इंग्लंडविरूद्ध कसोटी मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्याच्या एक दिवस आधी रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. रोहित शर्माने त्याच्या कसोटी कॅपचा फोटो शेअर करत कसोटीतून निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. यानंतर काही दिवसांनी विराट कोहलीने देखील भारताच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. हे दोघेही दिग्गज खेळाडू वनडे क्रिकेट खेळताना दिसणार आहेत.मोठ्या कालावधीनंतर भारताचा संघ प्रथमच विराट कोहली आणि रोहित शर्माशिवाय कसोटी दौऱ्यावर जाणार आहे. या मालिकेसाठी ऋषभ पंतला उपकर्णधाराची महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. आयपीएल दरम्यान पंतची बॅट शांत होती.

### पंतने भन्नाट उत्तर दिलं

पण शेवटच्या सामन्यात त्याने शानदार शतक झळकावले आणि फॉर्ममध्ये परतला.भारतातून रात्री रवाना होताना उपकर्णधार ऋषभ पंतला रोहित शर्माबाबत प्रश्न विचारण्यात आला, यावर पंतने भन्नाट उत्तर दिलं.भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना २० जूनपासून खेळवला जाणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। रविवार ।
। दि. 8 जून 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते लोकार्पण

# मावळात पुष्पलता डी.वाय. पाटील हॉस्पिटल-रिसर्च सेंटर!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उपस्थिती राहणार

। मावळ, आंबी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मावळ-आंबी परिसरातील नागरिकांसाठी एक नवा आरोग्यदायी टप्पा ठरावा, अशा उद्देशाने पुष्पलता डी.वाय. पाटील हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर या अत्याधुनिक, बहुविशिष्ट चॅरिटेबल रुग्णालयाचे भव्य उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात येत आहे.**



सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि समाजसेवक डॉ. डी. वाय. पाटील यांच्या "गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा संपूर्ण भारतभर पोहोचवण्याच्या" दूरदृष्टीतून प्रेरणा घेऊन या रुग्णालयाची स्थापना करण्यात आली आहे. उद्या, रविवार, दि. 8 जून रोजी दुपारी 12.30 वाजता उद्घाटन सोहळा आयोजित केला आहे. यावेळी डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेन्ट आणि चान्सलर डॉ. विजय पाटील, व्हॉईस प्रेसिडेन्ट आणि प्रो-चान्सलर शिवानी पाटील उपस्थित राहणार आहेत.

रुग्णालयात एआय समर्थित 1.5 टेस्ला एमआरआय, 256 स्लाइस सीटी स्कॅन, कार्डियक कॅथ लॅब, फ्लोरोस्कोपी, एंडोस्कोपी, मॅमोग्राफी, 2D इको, ट्रेडमिल टेस्ट व रंगीत डॉप्लरसह अल्ट्रासाऊंडसारखी अचूक निदान यंत्रणा कार्यरत आहे. याशिवाय, प्रगत पॅथॉलॉजी लॅब, रक्तबँक आणि संपूर्ण औषध वितरण व्यवस्था रुग्णसेवेसाठी तत्पर आहे. या रुग्णालयात सर्वसामान्य वैद्यकीय विभागांसह त्वचारोग, व्रणरोग, कुष्ठरोग, मानसोपचार, बालरोग, हाडरोग, ईएनटी, नेत्ररोग, स्त्रीरोग व प्रसूती, युरोलॉजी, कॉस्मेटोलॉजी, दंतचिकित्सा आणि लॅप्रोस्कोपिक सर्जरी अशा विविध उपचार शाखा कार्यरत आहेत. तसेच, शासकीय योजना व टीपीए सुविधा लागू करण्यासाठीही कार्यवाही सुरू आहे.

### 650 बेडचे अत्याधुनिक सुविधायुक्त रुग्णालय...

650 बेडचे हे तृतीयक काळजी केंद्र रुग्णांना सर्वसमावेशक उपचार सुविधा पुरवते. यामध्ये 60 खाटांचे इंटेन्सिव्ह केअर युनिट (मेडिकल, सर्जिकल, पीडियाट्रिक, कार्डिएक, रेस्पिरेटरी), 24 तास कार्यरत 30 बेडचा आपत्कालीन विभाग, 13 अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर आणि नवजात बालकांसाठी स्वतंत्र आयसीयू आदी महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध आहेत.

### मावळवासीयांसाठी नवे आरोग्य पर्व...

ऑक्सिजनच्या अखंड पुरवठ्यासाठी स्वतःचा पीएसए ऑक्सिजन प्लांट आणि लिक्विड ऑक्सिजन टाकी कार्यरत असून, जलद आणि विश्वासार्ह रुग्णवाहिका सेवा, तसेच सोयीस्कर स्थानामुळे या रुग्णालयाचे स्थानिक आरोग्यसेवेत मोठे योगदान राहणार आहे. पुष्पलता डी.वाय. पाटील हॉस्पिटलची अनुभवी वैद्यकीय टीम, तंत्रज्ञ व सहानुभूतीपूर्वक सेवा देणारे कर्मचारी हे रुग्णकेंद्रित दृष्टिकोनातून कार्यरत असून, आंबी तसेच परिसरातील नागरिकांसाठी एक नवे आरोग्यदायी पर्व सुरु होणार आहे.

# पीसीसीओईमध्ये राज्यस्तरीय कॉर्फबॉल पंच मार्गदर्शन शिबिर

## शिक्षण विश्व: अपूर्वा हिंगमिरे हिला सुवर्णपदक

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र कॉर्फबॉल असोसिएशन आणि पुणे जिल्हा क्रीडा कार्यालय, पुणे यांच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, निगडी व पिंपरी चिंचवड कॉर्फबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय राज्यस्तरीय कॉर्फबॉल पंच मार्गदर्शन शिबिर यशस्वीपणे संपन्न झाले.**



पीसीसीओई, निगडी येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन आमदार अमित गोरखे आणि उद्योजक नरेंद्र लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय पंच डॉ. इ. बी. श्रीकांत, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सचिव डॉ. अमेय काळे, माजी सचिव डॉ. उमेशराज पनेरू, डॉ. ज्ञानेश्वर चिमटे, सचिन ववले, ज्ञानेश पाटील आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

डॉ. श्रीकांत यांनी मार्गदर्शन केले. उद्योजक नरेंद्र लांडगे यांनी सांगितले की, कॉर्फबॉल या मैदानी खेळामध्ये पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या तीन महाविद्यालयांचे संघ आहेत. यामध्ये पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (पीसीसीओई), पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) आणि एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन या संघांचा समावेश आहे. पीसीसीओईचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. संतोष पाचारणे यांच्या मार्गदर्शनाखाली पीसीसीओई ची विद्यार्थिनी अपूर्वा हिंगमिरे हिने कॉर्फबॉल या खेळामध्ये सुवर्णपदक मिळवले आहे.

### शिबिराच्या सत्रात यांचा सहभाग

शिबिराच्या समारोप सत्रात धनुर्विद्या (आर्चरी) आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक डॉ. चामले, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल पंच डॉ. श्रीकांत आदी उपस्थित होते.

शिबिराच्या आयोजनात डॉ. ज्ञानेश्वर चिमटे, प्रा. संतोष पाचारणे, सचिन ववले, प्रा. मिलिंद थोरात यांनी सहभाग घेतला. सर्व सहभागींचे व यशस्वी पंचांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे (पीसीईटी) अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

PUSHPALATA
D Y PATIL HOSPITAL
AMBI, PUNE

You are warmly invited to

# Grand Inauguration Of

# Pushpalata DY Patil Hospital & Research Centre

A Beacon of Compassion.A Landmark in Healthcare

Join us as we unveil a world-class healthcare center where cutting-edge technology meets deep-rooted community care.

Chief Guest

## Shri Devendra Fadnavis

Honourable Chief Minister of Maharashtra

## Shri Ajit Pawar

Honourable Deputy Chief Minister of Maharashtra

Hosted by

**Dr. Vijay D Patil**
President & Chancellor
D Y Patil University

**Dr. Shivani V Patil**
Vice President & Pro-Chancellor
D Y Patil University

SUNDAY | JUNE 8 2025 | 12:30 PM

VENUE :
PUSHPALATA D Y PATIL HOSPITAL, D Y PATIL CAMPUS, MIDC ROAD, TAL. MAVAL, AMBI TALEGAON , MAHARASHTRA 410507

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26 ADMISSIONS OPEN

प्रज्ज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
# डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण









* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292